


दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217
वर्ष ३ रे | अंक : २७८वा | शनिवार दि १७ जानेवारी २०२६ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# अर्धवट कागदपत्रांवर १४ एकर वडिलोपार्जित सामूहिक शेतीची नियमबाह्य खरेदी?

## तारे परिवाराचा गंभीर आरोप; प्रशासनावर भ्रष्टाचाराचे सावट...

## जिल्हाधिकारी साहेब पीडित शेतकरी तारे परिवारांना न्याय केव्हा मिळेल

**जनसंचलन/बुलढाणा**

बुलढाणा शहरापासून अवघ्या बारा किलोमीटर अंतरावर असलेल्या परिसरात धक्कादायक प्रकार उघडकीस आला असून, तारे परिवारांची वडिलोपार्जित सामूहिक शेती असलेली तब्बल १४ एकर जमीन नियमबाह्य पद्धतीने खरेदी करून देण्यात आल्याचा गंभीर आरोप पीडित तारे परिवारांनी केला आहे.महाराष्ट्रभर गाजत असलेल्या या प्रकरणात संबंधित अधिकाऱ्यांनी अर्धवट व संशयास्पद कागदपत्रांच्या आधारे व्यवहार पूर्ण केल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. तारे परिवारांनी केलेल्या लेखी पत्रव्यवहारात स्पष्टपणे नमूद केले आहे की, ही जमीन सामूहिक मालकीची असताना कोणतीही वैध विभागणी,सर्व वारसांची संमती किंवा आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण न करता खरेदी-विक्रीचा व्यवहार कसा काय मंजूर करण्यात आला? असा थेट सवाल उपस्थित केला आहे. या कथित बेकायदेशीर व्यवहारामुळे आपली सामूहिक वडिलोपार्जित शेती हिरावली गेल्याचे सांगत तात्काळ ही खरेदी रद्द करून जमीन परत देण्याची मागणी करण्यात आली आहे. धक्कादायक बाब म्हणजे, न्याय मिळावा म्हणून महसूल,नोंदणी व पोलिस प्रशासनाकडे सातत्याने धाव घेऊनही कोणतीही ठोस




कारवाई न झाल्याचा आरोप तारे परिवारांनी केला आहे. मंडळ अधिकारी,तलाठी, ग्रामीण पोलीस स्टेशनमधील अधिकारी तसेच उपनिबंधक कार्यालयातील अधिकाऱ्यांवर थेट सहभाग, दुर्लक्ष आणि संगनमताचे आरोप करण्यात आले आहेत. ‘‘प्रशासनाने डोळेझाक केली नसती तर हा गैरव्यवहार शक्यच नव्हता,’’ असा संतप्त आरोप पीडित कुटुंबीयांनी केला आहे.

अखेर न्यायाच्या शोधात पीडित तारे परिवारांनी मीडियाकडे धाव घेतली असून,मीडियाकडे दिलेल्या सामूहिक १४ एकर जमिनीची खरेदी कशी अर्धवट व बोगस कागदपत्रांवर करण्यात आली ही सुरुवात सामूहिक सातबारावर केलेली विविध खोटी नोंद त्या आधारावर शासनाचा बुडविलेला लाखों रूपयांचा महसूल व या संपूर्ण बोगस खरेदी प्रकरणात असलेली संगनमत राजकीय दबाव शासकीय पगाराव्यतिरिक्त नातेवाईकांच्या नावे असलेली चल-अचल बेहिशेबी संपत्तीची उच्चस्तरीय चौकशी करून आमची १४ एकर शेती बुलडाणा जिल्हाधिकारी साहेबांनी आम्हाला परत मिळून द्यावी अशी विनंती पीडित तारे परिवाराने केली आहे. बनावट कागदपत्रांच्या आधारावर व आम्ही केलेल्या संबंधित विभागांना पत्र व्यवहारावर कुठलीच कारवाई साधी चौकशी न करता नेहमी आम्हालाच दम देण्यात येत आहे. १४ एकर जमीन खरेदी प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. सामान्य शेतकऱ्यांची जमीन अशा पद्धतीने लुटली जात असेल,तर प्रशासन नेमके कुणासाठी काम करते? हा सवाल आता बुलढाण्यातील सुज्ञ नागरिक विचारू लागले आहेत.

अजून बरेच काही पुढील भागात

## विदेशी दारूची अवैध वाहतूक; एकाला अटक

**जनसंचलन/बुलढाणा**

विदेशी दारूच्या अवैध वाहतूक व विक्रीविरोधात पोलिसांनी धडक कारवाई करीत ५६ हजार ४१० रुपयांच्या दारूसह तीन लाख रुपयांचे वाहन, असा ३ लाख ५६ हजार ४१० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी एकाविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे. जिल्ह्यात देशी-विदेशी दारूचा अवैध साठा व वाहतूक होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिस अधीक्षकांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेला कारवाईचे निर्देश देण्यात आले. त्यानुसार १५ जानेवारीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने बुलढाणा शहरातील धाड नाका ते सर्क्युलर रोडदरम्यान सापळा रचला. संशयास्पद हालचाली आढळल्याने एका चारचाकी वाहनाची झडती घेतली असता, वाहनातून बिनपरवाना विदेशी दारूचा साठा आढळून आला. या कारवाईत ३.५६ लाख रुपयांची विदेशी दारू जप्त करण्यात आली असून, संबंधित वाहनही ताब्यात घेण्यात आले आहे. या प्रकरणी सचिन समाधान रिंढे (वय ३१, रा. शेलसूर, ता. चिखली) याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडे वैध परवाना अथवा वाहतुकीची कागदपत्रे नसल्याचे तपासांत निष्पन्न झाले. त्यामुळे आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यानुसार गुन्हा नोंदविण्यात आला आहे. अवैध दारूविक्रीमुळे सामाजिक व कायदा-सुव्यवस्थेचे प्रश्न निर्माण होतात. त्यामुळे अशा कारवाया यापुढेही सुरू राहतील, असा इशारा पोलिसांनी दिला आहे. नागरिकांनी अवैध दारूविक्री अथवा वाहतुकीबाबत माहिती असल्यास तत्काळ पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहनही प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## ढाबा चालकावर लोखंडी रॉडने हल्ला

**जनसंचलन/ जळगाव जामोद**

जळगाव जामोद ढाब्यामध्ये दारू व जेवण देण्याच्या मागणीवरून झालेल्या वादातून ढाबा चालकावर लोखंडी रॉडने हल्ला केल्याची घटना माऊली फाटा ते टाकळी पारस्कर रस्त्यालगत असलेल्या आबाचा ढाब्यात घडली. या प्रकरणी १६ जानेवारी रोजी जळगाव जामोद पोलिस ठाण्यामध्ये आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी विनोद महादेव कावने (४०, रा. पंचवटी, नांदुरा, ता. नांदुरा) यांनी जळगाव जामोद पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार, १५ जानेवारी रोजी सायंकाळी ७:३० च्या सुमारास संशयित आरोपी प्रभू बावस्कार (रा. माऊली, ता. जळगाव जामोद) हा ढाब्यात आला व दारू व जेवणाची मागणी केली. यावर फिर्यादींनी सध्या काहीच उपलब्ध नाही, असे सांगितले; मात्र आरोपीने याकडे दुर्लक्ष करत शिवीगाळ केली. त्यानंतर ढाब्यात पडलेला लोखंडी रॉड उचलून त्यांच्या डोक्यावर व उजव्या हातावर मारहाण केली. या हल्ल्यात फिर्यादी गंभीररित्या जखमी झाला आहे. तसेच जीवे मारण्याची धमकी दिल्याचेही फिर्यादीत म्हटले आहे. पोलिस कर्मचारी भागवत उबरहंडे करत आहेत.

# ...आम्हा घरी धन डेटाचीच रत्ने...

एकविसाव्या शतकात डेटा हा केवळ संपत्ती नव्हे, तर डिजिटल संक्रमणाचा प्राणवायू झाला आहे. विसाव्या शतकात खनिज तेलाला जे महत्त्व प्राप्त झाले, तसेच वलय या शतकात डेटाभोवती निर्माण होत आहे. परंतु आयुष्याला गती आणि प्रकाश देणाऱ्या तेलाशी एका बाबतीत मात्र हा डेटा फारकत घेतो. तेलसाठे मर्यादित आहेत, तर डेटा मात्र अद्याप तरी अशा कोणत्या बंधन किंवा मर्यादांत अडकण्याची चिन्हे नाहीत. त्याचा आकार, व्याप्ती आणि गती दिवसेंदिवस वाढतच आहे. डिजिटल संक्रमणामुळे मानवी आहार-विहार आणि वर्तन-व्यवहारांच्या बहुतेक कक्षांमध्ये डेटाने प्रवेश केला आहे. ज्याच्या निर्मितीला आपण बहुतेक जण २४ तास कारणीभूत ठरतो, ज्याचे पुरवठादार आणि ग्राहकही आपणच होत आहोत, ती ही दोन अक्षरी जादू आहे तरी काय आणि तिचे महत्त्व, परिणाम-दुष्परिणाम व सुरक्षितता का आणि कशी महत्त्वाची आहे, हे समजून घ्यायला हवे. त्या संदर्भाने काही आकडेवारीवर नजर टाकू. २००३पर्यंत जगात दोन एक्झाबाइट (एक एक्झाबाइट म्हणजे एक अब्ज गिगाबाइट -जीबी) एवढ्या डेटाची उलाढाल झाली होती, जी सध्या दिवसागणिक होत आहे! २०२४मध्ये जगाने १४९ झेटाबाइट्स (एक झेटाबाइट म्हणजे एक हजार एक्झाबाइट) एवढ्या डेटाची उलाढाल केली. जगात आजवर निर्मिती झालेल्या डेटापैकी ९० टक्के हा फक्त २०२३ आणि २०२४ या दोन वर्षांतील आहे आणि दर चार वर्षांनी त्यात दुपटीने भर पडत जाणार आहे! डेटाचा वापर व व्याप्ती वाढेल तसे त्याच्या जोखमींचे धोकेही वाढत आहेत. त्यामुळे डिजिटल संक्रमण जबाबदारीने पार पाडण्यासाठी या परिसंस्थेतील सर्व घटकांना काही पावले उचलावी लागत आहेत. ई-मेल किंवा मेसेजमधून दिशाभूल करून गोपनीय माहिती मिळवणे (फिशिंग), सायबरचाचेगिरी करून संगणक यंत्रणा ठप्प करून त्या चालू करण्याच्या बदल्यात खंडणी उकळणे (रॅनसमवेअर), बनावट संगणक प्रणाली वापरण्याला उद्युक्त करून मागील दाराने संगणक यंत्रणात घुसखोरी करणे अशा अनेक मार्गांनी हे हल्ले होतात. यामध्ये तो माहितीसाठा हाताळण्याचे अधिकार असणाऱ्या व्यक्तीच सहभागी होतात. यामध्ये बेजबाबदार किंवा अजाणत्या व्यक्तींकडून उद्भवणाऱ्या धोक्यांचाही समावेश होतो. डिजिटल स्वरूपात साठवलेली गोपनीय माहिती अपेक्षित नसलेल्या व्यक्तींच्या हाती लागण्यातून इभ्रतीला धोका पोचणे, आर्थिक नुकसान, कायदेशीर अडचणी, कामकाजात व्यत्यय असे धोके संभवतात. भविष्यात एआय, क्वांटम गणना, ६-जी अशा भविष्यवेधी तंत्रप्रगतीमुळे डेटा प्रक्रियेची गरज व गती प्रचंड वाढणार आहे. ङ्गइंटरनेट ऑफ थिंग्जफ्पलीकडे जाऊन आता ङ्गइंटरनेट ऑफ बिहेविअर्सफ ही संकल्पना साकारली जात आहे. त्यामध्ये मानवी व्यवहारांचा अंदाज बांधणे आणि प्रसंगी त्यांना विशिष्ट वर्तनासाठी उद्युक्त करणे या दिशेने तंत्रविकासाचा विचार होत आहे. स्वाभाविकच त्यासाठी प्रत्येकाच्या वापरातील तंत्रसाधनांचे माहितीसंकलन व त्यांचा मेळ घालण्याला महत्त्व येणार आहे. माहितीसंकलन, तिचे पृथःकरण आणि त्यातून आर्थिक कमाई या स्वरूपातील व्यवसायाची वेगवेगळी प्रारूपे प्रस्थापित करून गुगल, ॲमेझॉन, फेसबुक, ॲपल, मायक्रोसॉफ्ट अशा तंत्र कंपन्यांनी अनेक देशांच्याही अर्थव्यवस्थांना मागे टाकण्याएवढे महाकाय रूप धारण केले आहे. माहितीसाठा हेच त्यांच्या ङ्गमहासत्ताफ होण्याच्या वाटेवर पेरलेले बीज ठरले, हे स्वाभाविक आहे. त्यामुळे, डिजिटल भविष्य साकारण्यात कोणते देश यशस्वी ठरतात, याएवढेच कोणत्या कंपन्या त्याचे सर्वाधिक लाभ उठवतात, ही बाबही महत्त्वाची ठरणार आहे. भारतासाठी हे डिजिटल परिवर्तन जेवढे आव्हानात्मक तेवढेच संधींची दारेही खुली करणारे ठरणार आहे. या परिवर्तनाच्या दृष्टीने आपण जगात आघाडी घेणारी काही पावलेही उचलली आहेत. आधार ओळखपत्रे किंवा युनिफाइड पेमेंट्स इंटरफेस (यूपीआय) व्यवस्था ही त्याचीच उदाहरणे. जगातील सर्वाधिक लोकसंख्या व सर्वांत मोठी बाजारपेठ असणारा देश म्हणून आपण जगातील २० टक्के डेटाची उलाढाल करतो. परंतु फक्त तीन टक्के डेटा आपल्या देशातच साठवण्याची व्यवस्था करतो. ही साठवणूक क्षमता येत्या पाच वर्षांत चार पटींनी वाढवण्याचे नियोजन आहे, मात्र त्यासोबतच, माहितीसाठा गोपनीयतेसंबंधीच्या गरज व अधिकारांची पुरेशी जाणीव नसणे, छोट्या व मध्यम उद्योग-व्यवसाय संस्थांकडे डेटा सुरक्षिततेसाठीची ठोस व्यवस्था नसणे, डेटा साठवणे व त्याचे व्यवस्थापन यांसाठी परदेशी तंत्रसंस्थांवरील अतिअवलंबित्व



अशा काही त्रुटीही दूर होणे गरजेचे आहे. या लेखाच्या प्रारंभी माहितीसाठ्याची तुलना खनिज तेलाशी केली होती. या दोहोंतील साम्य त्यांच्या साठ्यांएवढेच त्यांवरील प्रक्रियेला असणाऱ्या महत्त्वामध्येही आहे. कच्च्या खनिज तेलाचा साठा ज्याप्रमाणे शोधन (रिफायनिंग) प्रक्रियेनंतरच पेट्रोलियम उत्पादनांच्या रूपात वापरला जाऊ शकतो, तसेच माहितीसाठ्यांचेही आहे. त्यांची वैधता तपासणी, वर्गीकरण, पृथःकरण, त्याची उत्पन्नाशी सांगड घालण्याचे प्रारूप आणि या सर्वोपरी त्या माहितीसाठ्याची सुरक्षितता, पारदर्शकता व त्यासंबंधीचे उत्तरदायित्व यांतूनच त्यांची उपयुक्तता वाढीला लागणार आहे. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात खनिज तेलाच्या उलाढालींवर पेट्रोडॉलरचे अर्थकारण उदयाला आले. तेव्हा त्याला ङ्गकाळे सोनेफ म्हटले जात होते. एकविसाव्या शतकाचा पूर्वार्ध डेटाडॉलरच्या अर्थकारणाची पहाट अनुभवत आहे. आता डेटाला ङ्गनवे तेलफ म्हटले जात आहे. तेलाने मानवी जीवनव्यवहाराला ऊर्जा आणि गती दिली. डेटा कोणती भूमिका बजावेल, हे मात्र आज तरी काळाच्या उदरात दडले आहे.






*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# सोलापुरात ८७ जागांसह 'कमळ' फुललं; काँग्रेसचं अस्तित्व धोक्यात, फक्त २ जागा शिल्लक

**सोलापूर :** सोलापूर महानगरपालिकेच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने सर्व विरोधकांचा धुव्वा उडवत ऐतिहासिक विजय संपादन केला आहे. १०२ जागांच्या या चुरशीच्या लढतीत भाजपने तब्बल ८७ जागांवर विजय मिळवत महापालिकेत एकहाती सत्ता काबीज केली आहे. या निकालाने सोलापूरच्या राजकारणाची समीकरणे पूर्णपणे बदलून टाकली असून, एकेकाळी सत्तेच्या चाव्या हातात ठेवणारी काँग्रेस आता केवळ दोन जागांवर येऊन ठेपली आहे.विशेष म्हणजे, भाजपनंतर ८ जागांसह असदुद्दीन ओवैसी यांचा 'एम आयएम' (अखचखच) हा सोलापुरातील दुसऱ्या क्रमांकाचा मोठा पक्ष म्हणून समोर आला आहे.काँग्रेसचे अस्तित्व धोक्यात; केवळ २ नगरसेवक विजयीसोलापूरच्या राजकारणात काँग्रेसला आजवरचा सर्वात मोठा धक्का बसला आहे. एकेकाळी काँग्रेसची उमेदवारी मिळवण्यासाठी काँग्रेस भवनाबाहेर कार्यकर्त्यांची मोठी गर्दी असायची, मात्र यंदा केवळ दोनच उमेदवार महापालिकेत पोहोचू शकले आहेत. प्रभाग क्रमांक १६ मधून नरसिंह असादे आणि प्रभाग १५ मधून काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे यांनी कशीबशी बाजी मारली. दोघांव्यतिरिक्त काँग्रेसच्या एकाही शिलेदाराला विजयाचा गुलाल उधळता आला नाही.शिंदे-अजित पवार गटाची दाणादाणभाजपने '७५ पार'चा नारा



देत स्वबळावर निवडणूक लढवली होती. त्यामुळे महायुतीतील घटक पक्ष असलेल्या एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादीने ५१-५१ च्या सूत्राने युती केली. मात्र, मतदारांनी या दोन्ही पक्षांना नाकारल्याचे पाहायला मिळाले. शिंदेंच्या शिवसेनेला केवळ ४ जागा मिळाल्या, तर अजित पवारांच्या राष्ट्रवादीला फक्त एका जागेवर समाधान मानावे लागले. या निकालामुळे सोलापूर महापालिकेत या दोन्ही पक्षांची कामगिरी 'फेल' ठरली आहे.

भाजपचे वर्चस्व आणि एमआयएमची मुसंडीभाजपने या निवडणुकीत नियोजनबद्ध प्रचार करत निर्विवाद बहुमत मिळवले आहे. दुसरीकडे, एमआयएमने ८ जागा जिंकत प्रस्थापित पक्षांना धक्का दिला आणि महापालिकेत मुख्य विरोधी पक्षाच्या भूमिकेत जाण्याची तयारी केली आहे.

## विजयानंतर मनसे उमेदवाराचा उद्धव ठाकरेंना कॉल; किल्ला राखला





**मुंबई :** मुंबईत मनसे उमेदवार यशवंत किल्लेदार हे विजयी झाले आहेत. प्रभाग क्रमांक १९२ मधून ते विजयी झाले आहेत. यशवंत किल्लेदार यांनी शिवसेना भवनाच्या प्रभागातून ते निवडणुकीच्या रिंगणात उतरले होते. त्यामुळे त्यांचं जिकणं हे मनसेसाठी मोठा विजय मानला जात आहे. ते १ हजार ४२५ मतांनी विजयी झाले आहेत.या विजयानंतर उद्धव ठाकरे यांनी यशवंत किल्लेदार यांना फोन करत त्यांचं अभिनंदन केलं. तुमचं दादर आम्ही सांभाळलं, तुमचं हृदय मी सांभाळलेलं आहे, असा निरोप यावेळी किल्लेदारांनी उद्धव ठाकरे यांना दिला.नागरिकांनी माझ्यावर खूप प्रेम केलं, प्रचारादरम्यान मला खूप सहकार्य केलं. मी सगळ्यांचा खूप आभारी आहे. मी माझ्या कुटुंबाचेही आभार मानतो. कारण, गेल्या काही काळात राजकारणामुळे मी त्यांना वेळ देऊ शकलो नाही. तरी, त्यांनी मला खूप सांभाळून घेतलं. घर ते सांभाळत होते आणि मी बाहेरचं बघत होतो. त्यांची खूप मोलाची साथ मला लाभली.

ज्यादिवशी मला एबी फॉर्म मिळाला मी त्याच दिवशी म्हणालो होतो की मला एबी फॉर्म मिळालाय म्हणजे माझा विजय पक्का आहे. ही माझी गेल्या २५ -३० वर्षांची तपश्चर्या आहे. त्यात मी काय मिळवलं हे मला माहितीये. मला दोन्ही पक्षांचं जे सहकार्य होतं. त्यामुळे मी जिंकणार याची खात्री मला होती. मताधिक्य याहून जास्त मिळालं असतं, पण मतदान प्रक्रियेत जो गोंधळ झाला त्यामुळे हे घडलं आहे.

## ठाकरेंना कौल, शिंदेंच्या तुलनेत दुप्पट जागा

**मुंबई :** बीएमसी निवडणूक मध्ये शिवसेना-भाजप युतीने ११८ हून अधिक जागांवर विजयी आघाडी मिळवली आहे. तर ठाकरे बंधूंची युती ६६ जागांवर पुढे आहे. मात्र आकडेवारी पाहता मुंबईत ठाकरेंची शिवसेना ही एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेपुढे सरस ठरल्याचे चित्र आहे.मुंबई महापालिका निवडणुकीतभाजप ९०, तर शिवसेना अवघ्या २८ जागांवर आघाडीवर आहे. दुसरीकडे ठाकरे बंधूंच्या युतीमध्ये शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाला ५७ जागांवर यश आलं आहे, तर महाराष्ट्र नवनिर्माण सेना सात जागांवर पुढे आहे. काँग्रेसला १४ जागांवर यश आलं आहेशिवसेनेत फूट पडल्यानंतर खरी शिवसेना कुणाची हा प्रश्न निर्माण झाला होता. निवडणूक आयोगाने शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला दिला असला, तरी हा लढा सुप्रीम कोर्टात सुरु आहे. मुंबईकरांनी मात्र ठाकरेंना पसंती दिली आहे.एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेच्या तुलनेत उबाठा पक्षाला जवळपास दुप्पट जागा मिळाल्या आहेत. ठाकरे बंधूंच्या युतीमुळे ठाकरे समर्थक मतांची एकजूट झाली, मात्र एकनाथ शिंदेंनी वेगळी चूल मांडल्यामुळे मराठी मतांचे काही प्रमाणात विभाजन झाले.

## विधानसभेला पराभव, महापालिकेत सत्ता राखली, नेत्याची सिंहगर्जना

**मुंबई :** राज्यातील सर्व २९ महापालिकेच्या निवडणूकीसाठी मतमोजणी शुक्रवारी पार पडली. यामध्ये राज्यात बहुतांश शहरातील नागरिकांनी महायुतीच्या पारड्यात बहुमत दिल्याचे समोर येत आहे. मुंबई महापालिकेवरही २५ वर्षानंतर ठाकरेंना धक्का बसला आहे. महायुतीची सत्ता देशाच्या आर्थिक राजधानीत येणार आहे. पण मुंबईच्याच एमएमआर प्रभागात असलेल्या वसई-विरार महापालिकेत मात्र एका ठाकूरांच्या बहुजन विकास आघाडीने भाजप, शिवसेना शिंदे गटाचा पराभव केला आहे. त्यानंतर पक्षाचे नेते हितेंद्र ठाकूर यांची प्रतिक्रिया समोर येत आहे. वसई-विरारचा गड राखल्यानंतर हितेंद्र ठाकूर यांनी माध्यमांना प्रतिक्रिया दिली, ते म्हणाले की,कार्यकर्त्यांच्या जीवावर आपण निवडून येऊ शकतो उमेदवार कार्यकर्त्यांच्या मेहनतीने निवडून जातात माझा कार्यकर्ता जिंदाबाद आहे. तर मतदार यादीत घोळ नसता मतदान स्लो नसतं, मशीन बंद पडणार मशीन बदलणे यांसारखे घोळ झाले नसते तर आम्ही शंभर पार गेलो असतो. नेते आले, अभिनेते आले, खोटी आश्वासन दिली जी कामं करायची ती केली नाही, शेवटी लोक पाहतात. कार्यकर्ते पेटून उठले. कार्यकर्त्यांनी



ठाकुरंवरचं प्रेम दाखवले. हा विजय मी नाहीतर कार्यकर्त्यांनी मिळवला आहे मी कार्यकर्त्यांच्या पायाला डोकं लावतो त्यांच्यामुळेच मी जिंकलो. जोपर्यंत कार्यकर्ते आहेत तोपर्यंत ''टायगर जिंदा है' आता विरोधकांनी टीका करावी मी कधी विरोधकांवर टीका टिप्पणी करत नाही यापुढेही बोलणार नाही माझे काम बोलते. वसई-विरार शहरात गेले अनेक वर्षांपासून ठाकूरांची सत्ता आहे. या शहरात अनेक वर्षे त्याचे आमदार होते. पण २०२४ च्या निवडणुकीत मात्र भाजपने ठाकूरांचा पराभव करत दोन्ही जागांवर विजय मिळवला. त्यानंतर वसई विरार महापालिका निवडणूक ठाकूरांना जड जाणार असे दिसत होते. मात्र महापालिकेत शहरातील नागरिकांनी ठाकूरांना साथ देत बहुजन विकास आघाडी पक्षाला संजीवनी दिली. वसई-विरार महापालिकेत एकूण ११५ जागा आहेत.

## महापालिकेत सत्ता भाजप-सेना- NCPची, पण राज्यात चर्चा काँग्रेसच्या नेत्याची

**कोल्हापूर :** मुंबईसह राज्यातील २९ महापालिकेचे निकाल शुक्रवारी जाहीर झाले आहेत. अनेक महापालिकांमध्ये भाजपाची आणि महायुतीची आघाडी पाहायला मिळत आहे. राज्यातील सर्वाधिक महापालिकेत भाजपची सत्ता येणार हे आकडेवारीवरुन स्पष्ट होत आहे. या महापालिकेच्या निवडणूकांमध्ये बहुसंख्य शहरांमध्ये शिवसेना शिंदे गट, भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस वेगवेगळे लढले. पण मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली या ठिकाणी भाजप, शिवसेना शिंदे गटाची महायुती झाली होती. तशीच महायुती कोल्हापुरात पाहायला मिळाली. कोल्हापुरात महायुतीची सत्ता येणार हे स्पष्ट झाले असले तरी



काँग्रेसच्या एका नेत्याने दिलेल्या लढतीची चर्चा सर्वत्र होत आहे.कोल्हापुरात २०१५ नंतर महापालिका निवडणूक होत आहे. ११ वर्षानंतर झालेल्या कोल्हापुरातील निवडणुकीचा निकाल पाहिल्यास एकूण ८१ पैकी भाजप २६, शिवसेना शिंदे गट १५, राष्ट्रवादी काँग्रेस ४, काँग्रेस ३४, ठाकरे गट १ आणि इतर - १ असे पक्षीय बलाबल आहे. त्यामुळे भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र आल्यास बहुमताचा ४१ ही संख्या गाठू शकतात. या आकडेवारीवरून मात्र काँग्रेसने सतेज पाटील यांच्या नेतृत्त्वाखाली दिलेली टक्कर दिसून येते.कोल्हापूर कसं तुम्ही म्हणशीला तस्सं अशी मोहिम सतेज पाटील यांच्या नेतृत्त्वाखाली काँग्रेसने राबवली होती. शिवसेना उद्धव ठाकरे गटाला सतेज पाटील यांनी सोबत घेतले होते. ठाकरे गटाची ताकद मर्यादित असल्याने काँग्रेसकडेच नेतृत्व होते. सतेज पाटील विरुद्ध महायुतीचे सर्व घटक पक्ष असे चित्र कोल्हापुरात उभे राहिले होते. महायुतीला विधानसभेत कोल्हापुरात घवघवीत यश मिळाले असल्याने महापालिका निवडणूकही सहज जिंकता येईल असे दिसत होते. मात्र सतेज पाटलांनी एक खांबी तंब्बूने महायुतीला ही निवडणूक कठीण केली.

ज्यावेळी कल येत होते त्यावेळीही काँग्रेसने बऱ्यापैकी आघाडी घेतली होती. पण महायुतीच्या जागा काही वेळाने वाढल्या आणि सत्तास्थापन करता येईल इतपत झाल्या. तरी महापालिकेच्या निवडणुकीत काँग्रेस सर्वाधिक उमेदवार जिंकलेला पक्ष ठरला आहे.

# लखनौमध्ये पोलिसांची स्पा सेंटरवर छापेमारी, २० तरुणी आणि एक युवक सापडला..!

**लखनौ :** मेरठ शहरात पोलिसांनी अनधिकृत स्पा सेंटर्सवर मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत चार स्पा सेंटर्समधून २० मुली आणि एका तरुणाला ताब्यात घेण्यात आले आहे. मसाज आणि रिलॅक्सेशनच्या नावाखाली चालवल्या जाणाऱ्या या स्पा सेंटर्समध्ये अनैतिक कृत्ये होत असल्याचा संशय पोलिसांना होता. गेल्या काही काळापासून या संदर्भात पोलिसांना तक्रारी आणि माहिती मिळत होती.मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी नियोजनबद्धरीत्या एकाच वेळी चार ठिकाणी धाडी टाकल्या. या स्पा सेंटर्सची बुकिंग पारंपरिक पद्धतीने न होता व्हॉट्सअ‍ॅप आणि इतर ऑनलाइन माध्यम द्वारे केली जात होती. ग्राहक थेट सेंटरवर न येता आधी संपर्क साधत असत. त्यानंतर त्यांना लोकेशन पाठवले जात असे किंवा ते स्वतः लोकेशन शेअर करत असत. यामुळे हे संपूर्ण नेटवर्क बऱ्याच काळापासून पोलिसांच्या नजरेतून सुटले होते.काही प्रकरणांमध्ये ग्राहकांना थेट सेंटरवर न बोलावता आधी त्यांच्याशी बोलणी केली जात असे आणि 'सर्व्हिस' संबंधित माहिती दिली जात असे. त्यानंतरच पुढील प्रक्रिया ठरवली जात असे. या पद्धतीने गोपनीयता राखली जात होती आणि कायद्यापासून बचाव करण्याचा मार्गही तयार झाला होता.मंगळवारी पोलिसांनी चार वेगवेगळ्या टीम्स तयार करून एका निश्चित वेळी शहराच्या विविध भागांतील स्पा सेंटर्सवर छापा टाकला. अचानक झालेल्या या कारवाईमुळे तिथे उपस्थित लोकांमध्ये गोंधळ उडाला. पोलिसांनी घटनास्थळावरून २० युवती आणि एका तरुणाला ताब्यात घेतले. सर्वांची स्वतंत्रपणे चौकशी केली जात आहे. छापेमारीदरम्यान पोलिसांना स्पा सेंटर्समधून रजिस्टरही सापडले आहेत, ज्यात येणाऱ्या-जाणाऱ्यांची नोंद असल्याचे सांगितले जात आहे. याशिवाय अनेक मोबाईल फोन आणि डिजिटल उपकरणेही जप्त करण्यात आली आहेत. प्राथमिक तपासात या मोबाईल फोनमधून ऑनलाइन बुकिंगशी संबंधित पुरावे मिळाल्याचे सांगण्यात येत आहे.




पोलिस अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, जप्त केलेल्या काही मोबाईल फोनमध्ये असे फोटो आणि चॅट्स सापडले आहेत, जे स्पा सेंटर्समध्ये चालणाऱ्या दुष्कृत्यांकडे निर्देश करतात. मात्र, तपास पूर्ण झाल्यानंतरच या कृत्यांचा आवाका किती मोठा होता आणि त्यात कोण कोण सामील होते हे स्पष्ट होईल.पोलिस हे देखील शोधण्याचा प्रयत्न करत आहेत की या स्पा सेंटर्सचा संचालक कोण होता, त्यांच्यामागे कोण लोक होते आणि हे एखाद्या मोठ्या नेटवर्कचा भाग होते का. सध्या चारही स्पा सेंटर्सवर अनधिकृतपणे संचालन केल्याच्या आरोपाखाली गुन्हा दाखल करण्याची तयारी केली जात आहे.छापेमारीत २० युवतींसोबत केवळ एक तरुण असणे पोलिसांसाठीही धक्कादायक आहे. तपास अधिकारी याला केवळ योगायोग मानत नाहीत. युवतींना वेगवेगळ्या ठिकाणांहून येथे आणले जात होते आणि त्यांचा वापर स्पा सेंटरच्या 'सर्व्हिस'च्या नावाखाली केला जात होता, असे मानले जात आहे

## विवाहित बहिण बेपत्ता झाल्याचं ऐकून भाऊ धावला, गावात पोहोचला अन..


**जालना :** जालना जिल्ह्यातील वरखेडी परिसरात आज दुपारी एका २६ वर्षीय विवाहितेचा मृतदेह विहिरीत आढळल्याने संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. अश्विनी अमोल जोगदंड असे मयत महिलेचे नाव असून, तिच्या मृत्यूभोवती संशयाचे जाळे विणले गेले आहे. विशेष म्हणजे, विहिरीत आढळलेला मृतदेह रक्ताच्या थारोळ्यात असल्याने ही घटना केवळ आत्महत्या नसून घातपात असल्याचा संशय बळावला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अश्विनी ही कालपासून घरातून बेपत्ता होती. तिचा पती अमोल जोगदंड याने अश्विनीचा भाऊ संदीप खरात याला फोन करून ती बेपत्ता असल्याची माहिती दिली. बातमी समजताच संदीपने तातडीने वरखेडी गाठले आणि बहिणीचा शोध सुरू केला. मात्र, काही वेळातच पती अमोलने अश्विनीचा मृतदेह गावाशेजारील विहिरीत तरंगत असल्याची धक्कादायक माहिती दिली. संदीपने विहिरीकडे धाव घेतली असता, तिथे जे दृश्य दिसले त्याने काळजाचा थरकाप उडाला. आपली बहीण विहिरीत रक्ताच्या थारोळ्यात पडलेली पाहून भावाने एकच टाहो फोडला.याप्रकरणी मयत अश्विनीचा भाऊ संदीप खरात याने पती अमोल जोगदंड याच्यावर हत्येचा गंभीर आरोप केला आहे. 'माझा भावजी बहिणीला नेहमी मारहाण आणि त्रास द्यायचा. तिचे चारित्र्य आणि घरगुती वादातून हा प्रकार घडला असावा,' असा संशय संदीपने व्यक्त केला आहे.अश्विनीचे वडील मुंबईत मोलमजुरी करतात आणि आईचे काही दिवसांपूर्वीच निधन झाले आहे. अशा परिस्थितीत पित्याने लाडक्या लेकीचा संसार सुखाचा व्हावा म्हणून कष्ट केले, पण नियतीच्या मनात काही वेगळेच होते.घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी जिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आला आहे. या घटनेमुळे अश्विनीच्या दोन चिमुकल्या मुलांच्या डोक्यावरील आईचे छत्र हरपले असून, परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. अश्विनीने स्वतः उडी घेऊन आत्महत्या केली की तिची हत्या करून मृतदेह विहिरीत फेकून देण्यात आला? या प्रश्नाचे उत्तर आता शवविच्छेदन अहवालानंतरच स्पष्ट होईल.

## ५ वर्षांच्या मुलासह संपूर्ण कुटुंबाचा अंत

**चंदीगड :** एकाच कुटुंबातील तीन जणांचा मृत्यू झाल्याची भयंकर घटना घडली आहे. मृतांमध्ये पती, पत्नी आणि त्यांच्या ५ वर्षांच्या मुलाचा समावेश आहे. ही घटना हरियाणातील फरिदाबादच्या सरूरपूर भागात घडल्याची माहिती आहे. कुटुंबातील पती, पत्नी, मुलगा आणि मृताचा भाऊ हे सर्व रात्री झोपी गेले. मात्र, सकाळी त्यापैकी तिघे मृत आढळून आले. या घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी पोहोचले आणि त्यांनी तिघांचेही मृतदेह ताब्यात घेत शवविच्छेदनासाठी पाठवले. जिथे या तिघांचा मृत्यू झाला त्या खोलीत शेकोटी आढळून आली होती. मात्र, शवविच्छेदन अहवाल आल्यानंतरच मृत्यूचं कारण स्पष्ट होईल, असं पोलिसांनी सांगितलं.मृतांमध्ये रमेश, त्याची पत्नी ममता आणि त्यांचा ५ वर्षांचा मुलगा छोटू यांचा समावेश आहे. रमेशचा भाऊही त्यांच्यासोबत राहत होता. ममता, रमेश आणि त्याचा भाऊ हे सर्व कामगार आहेत. घरमालकाच्या म्हणण्यानुसार, त्यांनी दोन महिन्यांपूर्वीच त्यांच्याकडून घर भाड्याने घेतले होते. ते मूळचे बिहारचे होते.

## १४ वर्षीय मुलीवर सामूहिक अत्याचार

**मिरा-भाईंदर :** रात्रीच्या अंधारात, भर रस्त्यावर चारचाकी वाहनात १४ वर्षांच्या अल्पवयीन मुलीवर सामूहिक अत्याचार झाल्याचा संतापजनक प्रकार मिरा-भाईंदर शहरात उघडकीस आला आहे. भांगेच्या गोळ्या आणि मद्य पाजून मुलीला बेशुद्ध करत, नराधमांनी तिच्यावर अत्याचार केला आहे. यापूर्वी पालिका मुख्यालयात अल्पवयीन कर्मचाऱ्यावर अत्याचाराचा प्रकार घडला होता. त्यानंतर आता भररस्त्यावरील या घटनेमुळे संपूर्ण शहर सुन्न झालं आहे.मिळालेल्या माहितीनुसार, मिरा रोड परिसरात कुटुंबीयांसोबत राहणारी ही अल्पवयीन मुलगी ५ जानेवारीच्या रात्री तिच्यामित्राच्या विश्वासाला बळी पडली. २१ वर्षीय सलमान खान याने तिला चारचाकी वाहनात बसवून बळजबरीने एल.आर. तिवारी कॉलेज रोड या कमी वर्दळीच्या ठिकाणी नेले. त्याच्यासोबत त्याचा २४ वर्षीय मित्र सरदारजी देखील उपस्थित होता. त्यानंतर वाहनातच अमानुष अत्याचार सुरू झाला. प्रथम पीडित तरुणीला जबरदस्तीने भांगेच्या गोळ्या सलमान व त्याच्या मित्राकडून खायला घालण्यात आल्या. मात्र, तरीही ती शुद्धीत असल्याचे लक्षात येताच आरोपींनी तिला मद्य पाजून पूर्णपणे बेशुद्ध



केले. शुद्ध हरपल्यानंतर, दोन्ही आरोपींनी आळीपाळीने तिच्यावर चारचाकीतच अत्याचार केला. या अमानवी कृत्यानंतर धैर्य एकवटत पीडितेने घडलेला सारा प्रकार आपल्या कुटुंबीयांना दुसऱ्या दिवशी सांगितला. त्यानंतर पीडितेच्या कुटुंबीयांकडून मिरा रोड पोलिस ठाण्यात मंगळवारी तक्रार दाखल करण्यात आली होती. पोलिसांनी तत्काळ हालचाली करत बाललैंगिक अत्याचारासह गंभीर कलमांखाली गुन्हा नोंदवला होता. त्यानंतर त्यांनी शोध घेत, बुधवारी दुपारी दोन्ही आरोपींना अटक केली. दरम्यान, मिरा-भाईंदर महापालिका मुख्यालयात अत्याचाराची घटना ताजी असतानाच, आता भर रस्त्यावर घडलेला हा प्रकार शहरातील महिलांच्या सुरक्षिततेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करतो आहे. या घटनेमुळे मिरा-भाईंदरमधील नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

## महिला उमेदवाराच्या पतीवर जीवघेणा हल्ला, धक्कादायक माहिती समोर

**नांदेड :** निवडणुकीच्या प्रचारादरम्यान विरोधात भाषण केल्यामुळे काँग्रेस महिला उमेदवार सारिका भालेराव यांच्या पतीवर दुचाकीवर आलेल्या सहा अज्ञात हल्लेखोरांनी जीवघेणा हल्ल्याचा प्रयत्न केल्याची घटना घडली. सुदैवाने या हल्ल्यात महिला उमेदवाराचे पती बचावले आहेत. प्रभाग क्रमांक एकमध्ये हा थरार मंगळवारी १३ जानेवारी रात्री उशिरा घडला होता. शिवाजी भालेराव, असं महिला उमेदवाराच्या पतीचं नाव आहे. झालेला हा हल्ला हा राजकीय नसून दरोडा असल्याचं आता समोर आलं आहे.

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने संशयितांना अटक केली आहे. रितेश दिपक




पंडित (वय २२), शुभम संजय नरवाडे (वय १९), संघर्ष महेंद्र वगर (वय १९), चांदेश ऊर्फ ओमकार कोंडीबा जाधव (वय १८) आणि वैभव गोपाळ थोरात (वय १९) असं अटक करण्यात आलेल्या संशयितांची नावं असून दोन विधीसंघर्षग्रस्त बालकांचा यात समावेश आहे. हे सर्व नांदेड शहरातील रहिवासी आहेत.प्रभाग क्रमांक एकमधून काँग्रेसने शिवाजी भालेराव यांच्या पत्नी सारिका भालेराव यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवलं आहे. मंगळवारी १३ जानेवारी सायंकाळी प्रचार संपल्यानंतर उमेदवाराचे पती शिवाजी भालेराव हे आपल्या मित्रासोबत थांबले होते. याचदरम्यान दुचाकीवर आलेल्या काही अज्ञात हल्लेखोरांनी तलवारीने हल्ला करण्याचा प्रयत्न केला, सुदैवाने तलवारीचा वार चुकवल्याने ते बचावले. 'निवडणुकीत विरोधात भाषण का केलं, तुझा बियाणी करतो', अशी धमकी हल्लेखोरांनी दिली, असं काँग्रेस उमेदवाराच्या पतीने सांगितलं.याप्रकरणी भाग्यनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. स्थानिक गुन्हे शाखाच्या पथकाला गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली. त्यावरून नांदेड हद्दीतील बेलानगर तरोडा बु. येथे आरोपी असल्याचं समजलं. अरूणोदय नगर नांदेड येथील विहाराजवळ सापळा रचून संशयित आरोपींना ताब्यात घेऊन विचारपूस केली. त्यांनी व त्यांचे इतर साथीदार यांनी मिळून महिला उमेदवाराचे 'पती हे पैसे वाटत आहे', असं समजून त्यांच्याशेजारी ठेवलेली बॅग चोरून नेल्याची कबुली दिली.दरम्यान, आरोपींच्या ताब्यातून गुन्ह्यात वापरलेला एक खंजर जप्त करण्यात आला. तसेच मोटार सायकल पोलिसांकडून जप्त करण्यात आली आहे.

# आरसीबीची विजयाची हॅटट्रिक पूर्ण

**नवी मुंबई :** रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू थेशप झीशाळशी ङशरसींश २०२५-२६ मध्ये वर्चस्व गाजवत आहे. या हंगामाच्या नवव्या सामन्यात, आरसीबीने नवी मुंबईतील डीवाय पाटील स्टेडियमवर गुजरात जायंट्स विरुद्ध उल्लेखनीय कामगिरी करत एकतर्फी विजय मिळवला. ही आरसीबीसाठी विजयाची हॅटट्रिक आहे. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने आतापर्यंतचे तिन्ही सामने जिंकले आहेत. दरम्यान, गुजरात जायंट्सना चार सामन्यांमध्ये दुसरा पराभव पत्करावा लागला.या सामन्यात, गुजरात जायंट्सने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, परंतु आरसीबीची सुरुवात निराशाजनक झाली. पॉवरप्लेमध्ये, आरसीबीने फक्त ४५ धावा केल्या आणि चार विकेट गमावल्या. त्यानंतर राधा यादव आणि रिचा घोष यांनी पाचव्या विकेटसाठी शानदार भागीदारी केली. राधा यादवने ४७ चेंडूत ६६ धावा केल्या. दरम्यान, रिचा घोषने २८ चेंडूत ४४ धावांची धमाकेदार खेळी केली. दोघांनी ६६ चेंडूत पाचव्या विकेटसाठी १०५



धावा जोडल्या. त्यानंतर नॅडिन डी क्लार्कने १२ चेंडूत २६ धावा केल्या आणि संघाचा धावसंख्या २० षटकांत ७ बाद १८२ पर्यंत नेला. दुसरीकडे, गुजरात जायंट्सकडून सोफी डेव्हिनने सर्वाधिक तीन बळी घेतले. काश्वी गौतमनेही दोन बळी घेतले. रेणुका सिंग आणि जॉर्जिया वेअरहॅमनेही प्रत्येकी एक बळी घेतला.गुजरात जायंट्सने पाठलाग करताना चांगली सुरुवात केली. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या गोलंदाजांनी फलंदाजांना जास्त काळ स्थिरावू दिले नाही आणि सामना गुजरातकडून हिसकावून घेतला. या काळात श्रेयंका पाटीलने शानदार गोलंदाजी केली. तिने ३.५ षटकांत फक्त २३ धावा दिल्या आणि पाच बळी घेतले. परिणामी, गुजरात १८.५ षटकांत १५० धावांवर ऑलआउट झाला आणि आरसीबीने ३२ धावांनी सामना जिंकला.

श्रेयंका पाटील व्यतिरिक्त, लॉरेन बेल पुन्हा एकदा चमकली. या सामन्यात लॉरेन बेलने चार षटकांत फक्त २३ धावा देत तीन फलंदाजांना बाद केले. अरुंधती रेड्डी आणि नॅडिन डी क्लार्क यांनीही प्रत्येकी एक बळी घेत संघाच्या विजयात योगदान दिले. परिणामी, आरसीबी तीन विजयांसह गुणतालिकेत अव्वल स्थानावर आहे.

## तिसऱ्या वन डे मध्ये २ स्टार खेळाडूंना बाहेरचा रस्ता?

**मुंबई :** भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील तिसरा आणि अंतिम एकदिवसीय सामना रविवार, १८ जानेवारी रोजी इंदूरच्या होळकर स्टेडियमवर खेळला जाणार आहे. हा सामना मालिकेचा निकाल ठरवेल आणि भारतीय संघ व्यवस्थापन या महत्त्वाच्या सामन्यासाठी आपल्या प्लेइंग इलेव्हनमध्ये काही बदल करू शकते. अष्टपैलू रवींद्र जडेजाला खराब फॉर्ममुळे वगळले जाऊ शकते आणि त्याच्या जागी दिल्लीचा खेळाडू आयुष बदोनीला संधी मिळू शकते. तसेच, डावखुरा वेगवान गोलंदाज अर्शदीप सिंगलाही प्लेइंग इलेव्हनमध्ये समाविष्ट केले जाऊ शकते. सीनिअर अष्टपैलू रवींद्र जडेजा, ज्याने आतापर्यंत पाच एकदिवसीय सामन्यांमध्ये केवळ एक विकेट घेतली आहे. त्याला प्लेइंग इलेव्हनमधून वगळले जाऊ शकते. जडेजाने मालिकेतील आतापर्यंतच्या दोन सामन्यांमध्ये एकही विकेट घेतलेला नाही. राजकोट येथे खेळल्या गेलेल्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात त्याची फलंदाजीही निराशाजनक होती, त्यानंतर सोशल मीडियावर चाहत्यांनी त्याची खूप टीका केली.जडेजाच्या जागी, भारतीय संघ व्यवस्थापन दिल्लीचा खेळाडू आयुष बदोनीला संधी देण्याचा विचार करू शकते.



बदोनीला दुखापतग्रस्त वॉशिंग्टन सुंदरच्या जागी भारतीय संघात समाविष्ट करण्यात आले होते. तो एक अष्टपैलू आहे आणि फिरकी गोलंदाजीनेही संघाला योगदान देऊ शकतो. हा उजव्या हाताचा मधल्या फळीतील फलंदाज संघासाठी सहावा गोलंदाजाचा पर्याय ठरू शकतो.बदोनी व्यतिरिक्त, डावखुरा वेगवान गोलंदाज अर्शदीप सिंगलाही इंदूरमध्ये खेळण्याची संधी मिळू शकते. पंजाबचा हा गोलंदाज टी२० मध्ये भारतासाठी सर्वाधिक विकेट घेणारा गोलंदाज आहे. असे असूनही, पहिल्या दोन सामन्यांमध्ये त्याला प्रसिद्ध कृष्णावर प्राधान्य देण्यात आले होते. जरी प्रसिद्ध कृष्णाने दोन्ही सामन्यांमध्ये विकेट्स घेतल्या असल्या तरी, तो न्यूझीलंडच्या फलंदाजांना रोखण्यात अयशस्वी ठरला आणि बहुतेक वेळा अप्रभावी दिसला.

## टी-२० मालिकेसाठी संघात दोन मोठे बदल

**मुंबई :** भारत आणि न्यूझीलंड यांच्यात एकदिवसीय मालिका सुरु आहे. या मालिकेतील तिसरा आणि शेवटचा सामना हा रविवारी खेळवला जाईल. या नंतर टी-२० मालिका खेळवली जाईल.भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील पाच सामन्यांची टी-२० आंतरराष्ट्रीय मालिका २१ जानेवारीपासून सुरू होत आहे. या सामन्यापूर्वी टी-२० संघात मोठे बदल झाले आहेत. बीसीसीआयने नवीन संघ जाहीर केला आहे.खछऊ ी छन यांच्यातील सध्या सुरू असलेल्या तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेतील पहिला सामना ११ जानेवारी रोजी वडोदरा येथील बीसीए स्टेडियमवर खेळवण्यात आला. गोलंदाजी करताना थरिहळसींप डीपवरी बरगड्यांमध्ये अचानक वेदना जाणवल्या ज्यामुळे त्याला मैदान सोडावे लागले. नंतर स्कॅनमध्ये ताण दिसून आला. त्याला काही दिवस विश्रांती घेण्याचा सल्ला देण्यात आला आहे. बरे झाल्यानंतर तो बीसीसीआय सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये रिपोर्ट करेल. तंदुरुस्त झाल्यास तो भारतीय संघात परतेल.निवडकर्त्यांनी पहिल्या तीन सामन्यांसाठी जखमी तिलक वर्माच्या जागी श्रेयस अय्यरचा १५ सदस्यीय संघात समावेश केला आहे. तिलकला टेस्टिक्युलर टॉर्शनची समस्या होती.

## कर्णधाराने दिली चपराक, म्हणाला भारतात सामने खेळलो नाही तर १० वर्ष

**नवी दिल्ली :** भारताविरोधात गरळ ओकणाऱ्या बांगलादेशला आता त्यांच्याच कर्णधारने चांगलीच चपराक लगावली आहे. बांगलादेशने भारतामध्ये जाऊन जर वर्ल्ड कपचे सामने खेळले नाहीत, तर १० वर्षांत काय होऊ शकतं, हे थेट कर्णधार नझमुल हुसेन शांतोने सांगत सर्वांचीच झोप उडवली आहेटी-२० क्रिकेट वर्ल्ड कप स्पर्धा ७ फेब्रुवारी ते ८ मार्च दरम्यान होणार आहे. बांगलादेशमध्ये हिंदूंवरील अत्याचार वाढत असल्यामुळे मुस्तफिझूरच्या आयपीएलमध्ये खेळण्यास विरोध झाला. त्यानंतर बीसीसीआयने मुस्तफिझूरला वगळण्याची सूचना केली आणि बांगलादेशने भारतातील वर्ल्ड कप लढतीत खेळण्यास नकार दिला. बांगलादेशने आयसीसीकडे ही मागणी केली होती. त्यानंतर आयसीसीने बांगलादेशच्या क्रिकेट मंडळाला सांगितलं की, वर्ल्ड कपच्या सर्व सामन्यांचे नियोजन झाले आहे. त्यामुळे आता बांगलादेशचे सामने भारताबाहेर हलवण्यात येऊ शकणार नाहीत. पण तरीही बांगलादेशचे क्रिकेट मंडळ ऐकायला तयार नव्हतं. पण आता तर बांगलादेशच्या क्रिकेट मंडळाचा त्यांच्याच कर्णधाराने घरचा आहेर दिला आहे.बांगलादेशचा कसोटी



कर्णधार नजमुल हुसेन शांतो म्हणाला की, 'बांगलादेशच्या क्रिकेट मंडळाने भारतामध्ये वर्ल्ड कपचे एकही सामने खेळणार नाही, असे म्हटले आहे. पण मला वाटतं की, या गोष्टीचे मोठे परिणाम आपल्या देशावर आणि क्रिकेटवर होतील. या निर्णयाचे परिणाम किमान १० वर्षे तरी आपल्या खेळाडूंना भोगावे लागतील. त्यामुळे बांगलादेशच्या खेळाडूंवर येत्या १० वर्षांत दबाव वाढू शकतो आणि त्याचा वाईट परिणाम क्रिकेटवर होऊ शकतो. त्यामुळे बांगलादेशच्या क्रिकेट मंडळाने या गोष्टीचा पुन्हा एकदा विचार करावा. ' बांगलादेशच्या कर्णधाराने आता थेट क्रिकेट मंडळाला त्यांचा निर्णय कसा चुकीचा आहे, हेच सांगितलं आहे. त्यामुळे आता बांगलादेशच्या क्रिकेट मंडळाला कर्णधाराच्या वक्तव्याचा विचार करावा लागणार आहे.आम्ही कोणत्याही दबावासमोर झुकणार नाही,' असे क्रिकेट मंडळाने सांगितले होते.

# बांगलादेशचे खेळाडू खवळले, रागात स्पर्धाच बंद पाडली

**नवी दिल्ली :** बांगलादेशच्या खेळाडूंनी संपच पुकाराला आणि थेट बांगलादेश प्रीमिअर लीग ही स्पर्धा बंद पाडली. पण बांगलादेशचे खेळाडू एवढे का खवळले की त्यांनी थेट स्पर्धाच बंद पाडली, याचे एकमेव कारण आता समोर आलं आहे.बांगलादेशमध्ये हिंदूंवर अत्याचार सुरु आहेत. निष्पाप हिंदूंचे बळी घेतले जात आहेत. त्यामुळे भारतीयांनी बांगलादेशच्या खेळाडूंना आयपीएलमध्ये प्रवेश देऊ नये, अशी भूमिका घेतली. बीसीसीआयलाही नमते घ्यावे लागले आणि त्यांना बांगलादेशचा खेळाडू मिस्टाफिझूर रेहमानला थेट स्पर्धेच्या बाहेर काढले. त्यानंतर बांगलादेशच्या क्रिकेट संघटनेने भारताला धक्का देण्याची



रणनिती आखली आणि त्यानंतर आपण भारतात वर्ल्ड कपचा एकही सामना खेळणार नाही, असे सांगितले. ही गोष्ट आयसीसीने मान्य केली नाही. पण हे सर्व सुरु असतानाच बांगलादेशच्या खेळाडूंनी आपल्या देशात संप पुकारला. बांगलादेश प्रीमिअर लीगवर त्यांन बहिष्कार टाकला आणि ही स्पर्धा बंद केली. पण हे सर्व फक्त एका गोष्टीमुळे घडलं.बांगलादेश भारतात क्रिकेटचे सामने खेळणार नाही, यावर ठाम राहीली. त्यानंतर बांगलादेशच्या खेळाडूंचे जे भारतीय स्पॉन्सर आहेत, त्यांनी आर्थिक मदत करणे खेळाडूंना बंद केले. त्यामुळे बांगलादेशचे खेळाडू भीकेला लागू शकतात, हे सर्वांनाच कळले. बांगलादेशच्या काही खेळाडूंनी असा पवित्रा घेतला की, भारतात वर्ल्ड कपचे सामने खेळले तर त्याचा काहीही परीणाम होणार नाही. त्यावर बांगलादेश क्रिकेटचे संचालक नझमूल इस्लाम भडकले आणि त्यांनी हे खेळाडू म्हणजे भारताचे एजंट आहेत, असे म्हटले. त्यानंतर बांगलादेशचे खेळाडू खवळले. बांगलादेशच्या खेळाडूंच्या संघटनेने यामध्ये उडी घेतली आणि त्यानंतर या संघटनेने बांगलादेश प्रीमिअर लीग स्पर्धेवर बहिष्कार घालण्याचे कळवले. बांगलादेशच्या खेळाडूंनी कडक भूमिका घेतली आणि त्यांनी आजचा सामना होऊ दिला नाही. त्यामुळे बांगलादेश क्रिकेट संघटनेची जगासमोर लाज गेली.बांगलादेशच्या खेळाडूंनी थेट संपच पुकारल आणि स्पर्धाच बंद पाडली. पण बांगलादेशचे खेळाडू एवढे कोणावर रागावले आणि त्यांनी हा निर्णय का घेतला, याचे कारण आता समोर आले आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# अपमान करणे, लायकी काढणे म्हणजे बिग बॉस?

## 'तारक मेहता' फेम मराठमोळ्या अभिनेत्रीची पोस्ट

**मुंबई :** 'बिग बॉस मराठी' सीझन ६ ची सध्या सर्वत्र चर्चा सुरू आहे. त्यामध्ये अनेक कलाकार सहभागी झाले आहेत. त्यांच्यासह सोशल मीडिया इन्फ्लुएन्सरचीही शोमध्ये एन्ट्री झाली आहे. त्यामुळे वेगवेगळ्या क्षेत्रातील आणि वयोगटांतील स्पर्धक एकत्र आल्यानंतर 'बिग बॉस'च्या घरात अनेकदा त्यांच्यामध्ये बरेच वादविवाद होताना दिसत आहेत. अशातच 'तारक मेहता का उल्टा चश्मा' फेम अभिनेत्रीने याबद्दल प्रतिक्रिया दिली आहे.

'बिग बॉस मराठी' सीझन ६ मध्ये दीपाली सय्यद, सागर कारंडे, आयुष संजीव, राकेश बापट, विशाल कोटियन, तन्वी कुलते, सोनाली राऊत, प्राजक्ता शुक्रे असे काही कलाकार पाहायला मिळत आहेत; तर दुसरीकडे प्रभू शेळके, राधा मुंबईकर, ओमकार सावंत, अशी इतर क्षेत्रांतीलही मंडळी पाहायला मिळत आहेत.

११ जानेवारी रोजी 'बिग बॉस मराठी'चं ६ वं पर्व सुरू झालं. त्यानंतर दीपाली सय्यद, तन्वी कुलते, सोनाली राऊत, रुचिता जाधव, विशाल कोटियन आणि इतर काही स्पर्धकांमध्येही वाद झाले. 'बिग बॉस मराठी' सीझन ६ मधील स्पर्धकांबद्दल 'बिग बॉस'च्या पूर्वीच्या पर्वातील काही माजी स्पर्धकांनी प्रतिक्रिया व्यक्त केल्याचं पाहायला मिळालं. अशातच आता 'तारक मेहता का उल्टा चश्मा' फेम प्राजक्ता शिसोदेनेसुद्धा आता याबद्दल पोस्ट शेअर केली आहे.





प्राजक्ता इन्स्टाग्रामवर पोस्ट शेअर करीत म्हणाली, सिंपथी, मोठ्यांचा अपमान, उगाच आवाज मोठा करून बोलणं, कारणं नसताना भांडण, अगदी छोट्या गोष्टीवरूनही भांडण, मोठे काही बोलले की, त्यांची लायकी काढण्यापर्यंतची भाषा आणि मग हे सगळं करून झालं की, मग रडायचं. सगळ्यात महत्त्वाचं कोणाविषयी आदर नाही म्हणजे बिग बॉसचा गेम का? प्राजक्तानं या पोस्टमधून घरातील स्पर्धक कारण नसतानाही भांडत असून, एकमेकांप्रति आदर ठेवत नसल्याचं म्हटलं आहे. प्राजक्ता शिसोदे सोशल मीडियावर खूप सक्रिय असते आणि तिच्या दैनंदिन जीवनातील घडामोडी तसेच कामासंबंधीत अपडेट ती यामार्फत शेअर करत असते. अलीकडेच तिनं 'तारक मेहता का उल्टा चश्मा' या कार्यक्रमातून एक्झिट घेतली. त्यामध्ये तिनं सुनीता ही भूमिका साकारली होती.



## आयोगाच्या भोंगळ नियोजनावर निवेदिता सराफ संतापल्या..!

**मुंबई :** महानगरपालिका निवडणूक २०२६ सध्या जोरात सुरु आहे आणि १५ जानेवारी सकाळपासून मतदानाला सुरुवात झाली आहे. मात्र, मतदान केंद्रांवरील व्यवस्थेविषयी नाराजी व्यक्त करणाऱ्या नागरिकांमध्ये आता मराठी अभिनेत्री निवेदिता सराफ यांचाही समावेश झाला आहे. अभिनेत्री निवेदिता सराफ यांनी निवडणूक आयोगाच्या दुर्बल व भोंगळ नियोजनावर संताप व्यक्त केला आहे.

निवेदिता सराफ यांनी सांगितलं की त्या विलेपार्ले येथील मतदान केंद्रावर मतदानासाठी गेल्या होत्या. मात्र, त्या मतदान यादीत त्यांचे नावच दिसले नाही. कर्मचाऱ्यांनी सांगितले की त्यांना दुसऱ्या केंद्रावर जावं लागेल. पण, तेथे पोहोचण्याआधी सर्व मतदान अधिकारी निघून गेले होते आणि कोणताही स्पष्टीकरण मिळालं नाही. यामुळे त्यांना सुमारे एक तास मतदार केंद्रावर चकरा माराव्या लागल्या, तसेच संपूर्ण प्रक्रियेतील गोंधळामुळे त्यांचा रोष व्यक्त केला.

निवेदिता सराफ म्हणाल्या, ङ्गमी मतदानासाठी वेळेवर पोहोचले पण मतदार यादीत माझं नाव नव्हतं; ते दुरुस्त करण्यासाठी सांगितलं तर सर्व कर्मचारी निघून गेले. नाव आहे तर सिरीज नंबरच नाही असा गोंधळ सुरु आहे.

## ४ तास प्रवास करून मतदानासाठी मुंबईत आले नाना पाटेकर

**मुंबई :** महानगरपालिका निवडणुकीत अनेक बॉलीवूड स्टार्सनी मतदान केलं. तसेच बऱ्याच मराठी कलाकारांनीही मतदानाचा हक्क बजावला. ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांनीही मतदान केलं. नाना पाटेकर मुंबईतील एका मतदान केंद्रावर मतदान करण्यासाठी पोहोचले, तिथे त्यांनी सांगितलं की मतदान करण्यासाठी मुंबईला येण्यासाठी त्यांनी तीन तासांचा प्रवास केला.



नाना पाटेकर पुण्याजवळच्या एका गावात फार्महाऊसवर राहतात. शूटिंग नसेल वा काही काम नसेल, तर ते मुंबई किंवा पुण्याऐवजी गावी राहणंच पसंत करतात. नाना पाटेकर यांना गावीच निसर्गाच्या सानिध्यात करमतं, असं ते बरेचदा सांगतात. पण आज मतदानाचा हक्क बजावण्यासाठी त्यांनी पुणे ते मुंबई असा तीन ते चार तासांचा प्रवास केला.

मतदानाचा हक्क बजावण्यासाठी इतक्या लांबचा प्रवास करण्यात काहीच अडचण आली नाही, असं त्यांनी मत व्यक्त केलं. देशाचे नागरिक म्हणून मतदानाची जबाबदारी पार पाडून खूप आनंद झाला, असं त्यांनी सांगितलं. मतदान केंद्राबाहेर माध्यमांशी बोलताना नाना पाटेकर म्हणाले, त्यांचा मतदानावर पूर्ण विश्वास आहे आणि प्रत्येक नागरिकाने हा अधिकार बजावला पाहिजे. लोकांना कितीही व्यग्र असलात तरी वेळ काढून मतदान करण्याचं आवाहन केले. नाना पाटेकरांसह बऱ्याच सेलिब्रिटींनी मतदान केलं. यामध्ये अक्षय कुमारचाही समावेश आहे. अक्षय कुमार सकाळी लवकर मतदान केंद्रावर पोहोचला आणि मतदानाचा हक्क बजावला. तसेच त्याने नागरिकांना मतदान करण्याचं आवाहन केलं.

## मऊ त्वचेसाठी रकुल वापरते बनाना मास्क; तर तेलकट चेहऱ्यासाठी 'हा' उपाय

**मुंबई :** वाढते प्रदूषण, असंतुलित आहार, पाणी कमी पिणे, वेळेत न झोपणे, कमी झोपणे, व्यायाम न करणे, फास्ट फूडचे प्रमाण जास्त असणे या आणि अशा अनेक कारणांमुळे आरोग्याच्या समस्यांना सामोरे जावे लागते.

याबरोबरच अशाच कारणांमुळे त्वचेच्या समस्या निर्माण होणे, केसगलती सामना करावा लागणे अशा समस्यांचा अनेकांना सामोरे जावे लागते. बरेचजण त्वची चांगली राहावी यासाठी यासाठी विविध उपाययोजना करतात. घरातील काही वस्तूंचा वापर करून त्वचा निरोगी राहावी यासाठी काळजी घेतात.

आता लोकप्रिय अभिनेत्री रकुल प्रीत सिंगने एका मुलाखतीत ती तिच्या त्वचेची कशी काळजी हे सांगितले आहे. रुकुल प्रीत सिंगने नुकतीच ह्युमन्स ऑफ बॉम्बेला मुलाखत दिली. या मुलाखतीत तिला तुझी स्कीन केअर रूटीन काय आहे, असे विचारले. त्यावर ती म्हणाली, ङ्गकाही घरगुती उपाय आहेत. जसे की हळद आणि बेसन (डाळीचं पीठ) यांचे मिश्रण करून ते मी लावते. तसेच बनाना मास्क (इरपरपर चरीज़) आहे. बनाना मास्क म्हणजे नेमकं काय? असे विचारल्यानंतर रकुल म्हणाली, ङ्गथोडं दही घ्या, एक केळ घ्या, मध घ्या. ते सगळं एकत्र करायचं आणि बारीक करायचं. हे मिश्रण चेहऱ्यावर लावायचं. या मास्कमुळे त्वचा मऊ होते. पुढे अभिनेत्री असेही म्हणाली, ङ्गतुमची त्वचा कशी आहे, त्यावरून हे ठरतं की त्या त्वचेवर काय लावायचं आहे. जेव्हा त्वचा कोरडी वाटते असते, त्यावेळी बनाना मास्क लावते. ज्यावेळी त्वचा तेलकट वाटते, त्यावेळी मी हदळ आणि बेसन लावते. बेसन,चिमुटभर हळद, थोडासा मध किंवा कच्चे दूध हे मिश्रण करून लावते. चेहरा टॅन होतो (काळा पडतो) तो घालवण्यासाठी हे मिश्रण उत्तम आहे. जेव्हा आऊटडोअरला शूटिंग करत असते, त्यावेळी मी टमाटरचे काप चेहऱ्यावर ठेवते.ङ्घ

रकुल पुढे असे म्हणाली, ङ्गमी माझ्या आईला असे करताना पाहिले आहे. ती जे फळ खात असते, ते ती चेहऱ्यालाही लावते. जर पपई खात असेल तर ती पपई चेहऱ्यावर लावते. मी तिला हे करताना पाहिले आणि तेच मीही करतेङ्घ, असे म्हणत रकुलने ती तिच्या त्वचेची कशी काळजी घेते हे सांगितले. रकुलबरोबरच अनेक अभिनेत्री, अभिनेते त्यांच्या जीवनशैलीबद्दल खुलेपणाने सांगतात. याबरोबरच, अनेजण त्यांच्या डाएट, व्यायाम याबद्दलही खुलासे करतात. अक्षय कुमार, करीना कपूर खान, तमन्ना भाटिया, भूमी पेडणेकर, नाना पाटेकर, अक्षय खन्ना हे आणि इतर कलाकार त्यांच्या दिनचर्येबद्दल विविध

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# देवदूतच...! सावकारी जाचातून शेतकऱ्यांची सुटका

## जिल्हाधिकाऱ्यांचा पुढाकार ; शेतकऱ्यांनी मानले आभार

**जनसंचलन/ बुलढाणा**



जिल्ह्यात अवैध सावकारी कर्जाच्या त्रासातून होणारी शेतकऱ्यांची पिळवणूक आणि आत्महत्यांना आळा घालण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ किरण पाटील यांनी पुढाकार घेवून जिल्ह्याच्या विविध भागातील अवैध सावकाराकडील जमीनी परत करण्याची मोहीम हाती घेतली होती. या मोहिमेंतर्गत ज्या शेतकऱ्यांना त्यांच्या जमीनी परत मिळाल्या त्यांनी आज जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेवून त्यांचा सत्कार करुन आभार व्यक्त केले. जिल्हाधिकारी आमच्यासाठी देवदूतच असल्याची भावना देखील शेतकऱ्यांनी यावेळी व्यक्त केली. जिल्हाधिकारी डॉ किरण पाटील यांच्या निर्देशानुसार जिल्हा उपनिबंधक कार्यालयामार्फत महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियमातील कलमांनुसार अवैध सावकाराकडील जमीनी शेतकऱ्यांना परत करण्याची मोहीम राबविण्यात येत आहे. याअंतर्गत जलदगतीने सुनावणी घेवून प्रकरण निकाली काढले जात आहेत. यातील बहुतांशी प्रकरणांमध्ये चौकशीअंती शेतकऱ्यांच्या बाजूने निर्णय दिले जात असून अवैध सावकारांवर गुन्हा देखील दाखल केले जात आहे. या मोहिमेसाठी जिल्हाधिकारी डॉ किरण पाटील यांनी घेतलेला पुढाकार आणि जिल्हा उपनिबंधक कार्यालयाच्या कामकाजाचे कौतुकही शेतकऱ्यांनी यावेळी व्यक्त केला. या शेतकऱ्यांमध्ये विशेषतः नागेश केशव कोल्हारे रा. घाटबोरी ती. मेहकर यांची सावकाराकडील ३ एकर २४ गुंठे जमीन, विजय बा. व्यवहारे रा. पोफळी ता. मोताळा यांची ६२ गुंठे जमीन, रविंद्र कांडेलकर रा. वाघोळा ता. मलकापूर यांची ८२ गुंठे जमीन, विजय रामदास राठोड रा. हिवरा गडलिंग ता. सिंदखेड राजा ७ एकर ३० गुंठे, शंकर कोंडिबा वाघ रा. पांगरी ता. देऊळगाव राजा यांची १.३८ हेक्टर, संजय उत्तम पाचरणे रा. मेहकर यांची ०.७१ हेक्टर जमीन त्यांना परत मिळाल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. यावेळी सावकारी कर्जामुळे मातृत्व हरवलेल्या वैष्णवी कैलास ढोले या मुलीने आणि तिच्या वडिलांनी देखील त्यांच्या संघर्षात जिल्हाधिकाऱ्यांनी केलेल्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले. यावेळी शेतकऱ्यांचा सत्कार स्वीकारुन जिल्हाधिकारी डॉ किरण पाटील म्हणाले की, केंद्र व राज्य शासनाने लोकहिताचे कायदे केले आहेत. जिल्ह्यात या कायद्यांची चोख अंमलबजावणी करुन शेतकरी व नागरिकांना न्याय देण्याचे माझे कर्तव्य असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच बुलढाणा जिल्ह्यात अवैध सावकारांकडून होत असलेली पिळवणूक रोखण्यासाठी प्रशासनाकडून कडक कारवाई सुरू असून शेतकऱ्यांनी निर्भयपणे तक्रारी दाखल कराव्यात, असे आवाहनही त्यांनी केले आहे. या लोकोपयोगी कार्याबद्दल शिवाजी शिक्षण संस्था अमरावतीच्या चिखली येथील शिवाजी विद्यालयामार्फत जिल्हाधिकारी डॉ किरण पाटील यांचा सत्कार देखील करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. यापूर्वी जिल्हाधिकारी यांच्या निर्देशानुसार जिल्हा उपनिबंधक प्रशासनाने मोहिमेंतर्गत महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियमातील कलमांनुसार जिल्ह्यातील ६९ प्रकरणातील अवैध सावकारांकडील ७४.२७ हेक्टर आर शेतजमीन शेतकऱ्यांना परत करण्यात आली आहे. यात ५५ प्रकरणांत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच ६५१ प्रकरणांची चौकशी पूर्ण झाल्याची माहिती जिल्हा उपनिबंधक डॉ. महेंद्र चव्हाण यांनी दिली.

# जिल्हा महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा

## प्रशासनात सांघिक भावना रुजविणार उपक्रम

**जनसंचलन/बुलढाणा**




शासकीय कार्यपद्धतीमध्ये सांघिक भावनेने कामकाज केले जाते तसे मैदानी खेळातून या सांघिक भावनेची उजळणी होणे आवश्यक आहे. जिल्हा महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा हा प्रशासनातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सुप्त गुणांना वाव, उत्तम प्रकृतीमान आणि सांघिक व मित्रत्वाची भावना रुजविणारा उपक्रम असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ किरण पाटील यांनी केले. जिल्हा प्रशासनाच्या वतीने जिल्हा महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धे चे आयोजन जिल्हा क्रीडा संकुल येथे करण्यात आले होते. या स्पर्धे च्या उद्घाटनावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाला उद्घाटक म्हणून जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांची उपस्थिती होती. यावेळी अपर जिल्हाधिकारी सुधीर खांदे, सर्व उपजिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, पोलीस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. प्रशासनातील दैनंदिन कामकाज पार पाडतांना अधिकारी व कर्मचाऱ्यांची प्रकृती चांगली राहण्यासाठी तसेच खेळाडूवृत्ती कायम राहावी यासाठी क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांनी स्पर्धकांना केले. या स्पर्धेच्या उद्घाटनाप्रसंगी जिल्हाधिकारी डॉ किरण पाटील आणि पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांनी क्रिकेट स्पर्धेत सहभागी होत षटकार लगावले. कार्यक्रमाचे सुरुवात दिपप्रज्वलनाने करण्यात आली. प्रास्ताविक निवासी उपजिल्हाधिकारी सुरेश कव्हळे यांनी केले. सूत्रसंचालन तहसिलदार वृषाली केसकर, शिवानंद वाकदकर यांनी केले.




# हिंद दी चादर गुरु तेगबहादुर साहिब यांच्या गौरवशाली इतिहासाचे स्मरण

**जनसंचलन/बुलढाणा**

हिंद दी चादरफ,श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या शहिदीला ३५० वर्षे पूर्ण होत असल्याने महाराष्ट्र शासन आणि श्री गुरु तेग बहादुर साहिबजी ३५० वी शहिदी समागम राज्यस्तरीय समितीमार्फत गेल्यावर्षी ७ डिसेंबर रोजी झालेल्या देखण्या आयोजनानंतर २४ आणि २५ जानेवारी २०२६ रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत नांदेड येथे भव्य अध्यात्मिक कार्यक्रमाचे आयोजन होत आहे. श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांनी स्वाभीमान आणि देश रक्षणासाठी दिलेले बलिदान अनन्य साधारण आहे. त्यांच्या परिवारातील सदस्यांनीही देशासाठी शहादत दिली. हा गौरवशाली इतिहास सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. त्याचे स्मरण करणारा आणि गुरुंनी देशासाठी दिलेल्या बलिदानावर प्रकाश टाकणारा हा लेख

कश्मीरचा सुभेदार हा शिखांचे नववे गुरु तेगबहादुर साहिब यांच्या मदतीसाठी गेले. ङ्गना पेह देना ! ना पेह सेनाफ म्हणत (घाबरायचे नाही व घाबरवयाचेही नाही) कश्मीरींच्या रक्षणासाठी गुरु तेगबहादुर साहिब यांनी थेट तत्कालीन सत्तेला आवाहन दिले व दिल्लीकडे कुच केली. आग्रा येथेच तेगबहादुरांना अटक करण्यात आली.दिल्लीला आणून त्यांना धर्मांतराची बळजबरी करण्यात आली. गुरु तेगबहादुरांनी त्यास नकार देऊन लाल किल्ल्यासमोरील चांदणीचौकात बलिदान दिले. त्यांचे हे बलिदान इतिहासात अमर झाले व भारतभूमीचे कवच म्हणून त्यांना ङ्गहिंद दी चादरफम्हणून ओळखले जाते. सत्य व अहिंसेचे प्रेषित असलेल्या तेगबहादुरांनी बलिदान देऊन मानवी स्वातंत्र्याचा व स्वतःस पटेल तो धर्म आचरण्याचा आदर्श भारतीयांना घालून दिला. श्री गुरु तेग बहादुर साहिब यांच्या सोबत अनेक समाज उभे होते विशेषत: सिकलीगर, बंजारा, लबाना, मोह्याल, सिंधी समाजांनी या संघर्षात मोलाचे योगदान देत तेगबहादुर साहेबांनी दिलेल्या देश व मानवतेच्या रक्षणाची शिकवण सर्वदूर पोचवली. भाई मतीदास, भाई सतीदास आणि भाई दयाल गुरु तेग बहादुरांच्या आत्मसन्मानासाठी आणि गुरुनिष्ठेसाठी शहीद झाले. हे समाज सेवाभाव, साहस आणि श्रद्धेसाठी ओळखले जातात. दिल्लीच्या ऐतिहासिक लाल किल्ला परिसरातील चांदणी चौकात सीसगंज गुरुद्वारा सर्व भारतीयांसाठी प्रेरणास्त्रोत ठरला आहे. याच ठिकाणी गुरु तेगबहादुरांनी तत्कालीन सत्तेला आपल्या प्राणांच्या आहुतीतून भारतीयांच्या एकीचा व सद्भावनेचा संदेश दिला. २५ मे १६७५ रोजी सत्ताधाऱ्यांच्या आज्ञेनुसार गुरु तेगबहादुरांचे शिर अमानुषपणे धडापासून वेगळे करण्यात आले आणि ङ्गजो कोणी तेगबहादुरांचे उत्तर कार्य पार पाडेल त्याचे व त्याच्या कुटुंबीयांचे तुकडे करून दिल्लीच्या चारही दिशांच्या प्रवेशद्वारांवर लटकविले जातील,फ असा फतवा काढला. अशा दहशतीच्या वातावरणामध्ये ढवळून निघालेले भारतीय मन नव्या उमेदीने उभे राहण्यासाठी धडपडू लागले. सत्तेची अवाज्ञा करून भाई जेतासिंह यांनी त्यांचे ङ्गशिरफआनंदसाहेब दरबार येथे शिखांचे दहावे गुरू आणि गुरू तेगबहादुरांचे पुत्र गुरू गोविंदसिंह यांच्या सुपूर्द केले. इकडे भाई लखीशाह बंजारा यांनी मुलगा नाथईय्याजी यांच्या मदतीने गुरू तेगबहादुरांचे ङ्गधडफ दिल्लीतीलच रकाबगंज गावात आणले व आपल्या राहत्या घरात ते ठेवून घरालाच अग्नी दिला. त्यानंतर त्याच ठिकाणी पवित्र अस्थी जमिनीत पुरल्या आज तिथेच ङ्गरकाबगंज गुरुद्वाराफउभा आहे.

# मुंबईत मेहकरच्या आमदारांचा पॉवर प्ले! सिद्धार्थ खरातांनी दाखवला राजकीय दम...

**जनसंचलन/मेहकर**

मुंबईत झालेल्या महानगरपालिका निवडणुकीत मेहकरचे दमदार आमदार सिद्धार्थ खरात यांनी पुन्हा एकदा आपला राजकीय प्रभाव सिद्ध केला आहे. विक्रोळी पार्क साईट येथील वार्ड क्रमांक १२३ आणि १२४ मधून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उमेदवार सुनिल मोरे आणि सकीना खान व धर्मेंद्र काळे वार्ड क्रमांक २६ यांनी शिवसेना (शिंदे गटाच्या) उमेदवारांचा दणदणीत पराभव केला आहे. या विजयावर प्रतिक्रिया देताना आमदार सिद्धार्थ खरात म्हणाले, मी मुंबईत प्रचार करताना ठामपणे सांगितले होते की १६ तारखेला मला विजयाचा फोन येईल. आज खरोखर तो फोन आला आणि दोन्ही उमेदवार विजयी झाल्याची बातमी मिळाली. मनापासून आनंद वाटतो. आमदार खरात यांनी विजयी उमेदवारांचे जाहीर अभिनंदन करताना विरोधकांनाही अप्रत्यक्ष राजकीय चपराक दिली.




हा निकाल म्हणजे केवळ दोन वॉर्डांचा विजय नसून, ठाकरे गटाच्या वाढत्या ताकदीचा आणि आमदार सिद्धार्थ खरात यांच्या दमदार नेतृत्वाचा व प्रभावी प्रचाराचा थेट परिणाम असल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे.

# मेहकर तालुक्यातील उद्धवा विठ्ठलवाडी ग्रामपंचायतीत खळबळ; उपसरपंचांविरोधात अविश्वास ठराव दाखल




**जनसंचलन/मेहकर**

तालुक्यातील उद्धवा विठ्ठलवाडी ग्रामपंचायतीत सत्ताकारण तापले असून उपसरपंच रमेश केशवराव खोडके यांच्याविरोधात अविश्वास ठराव सादर करण्यात आल्याने राजकीय वातावरण चांगलेच ढवळून निघाले आहे. सरपंच धनराज राठोड यांच्यासह सात ग्रामपंचायत सदस्यांनी थेट तहसीलदारांकडे लेखी अर्ज देत उपसरपंचांच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. उपसरपंचांच्या मनमानी कारभारामुळे ग्रामपंचायतीच्या कामकाजात अडथळे निर्माण होत असून सदस्यांचा त्यांच्यावरचा विश्वास पूर्णतः उडाल्याचा आरोप अर्जात करण्यात आला आहे. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ च्या कलम ३५ अंतर्गत विशेष सभा बोलावून अविश्वास ठराव घेण्याची ठाम मागणी करण्यात आली आहे. या घडामोडीमुळे गावाच्या राजकारणात प्रचंड खळबळ उडाली असून आता तहसील प्रशासन कोणती कारवाई करते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# अवघ्या तीन महिन्यांत वाकी बु. जि.प. शाळेचा कायापालट; मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळात ठरली आदर्श!



**जनसंचलन/ देऊळगाव राजा**

जिल्हा परिषद शाळांची ओळख बदलू शकते, हे वाकी बुद्रुक येथील जि.प. मराठी उच्च प्राथमिक शाळेने अवघ्या तीन महिन्यांत सिद्ध करून दाखवले आहे. ऑनलाईन बदल्यांनंतर नव्याने रुजू झालेल्या महिला मुख्याध्यापिका विद्या ढवळे-गायकवाड व त्यांच्या सहकारी शिक्षकांनी नवा गडी, नवा राजफ्फ ही म्हण प्रत्यक्षात उतरवत शाळेला अक्षरशः बोलके रूप दिले आहे. मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळाफ अभियानाच्या तिसऱ्या टप्प्यात सहभागी होताना अनेक अडचणी होत्या. मात्र जिद्द, नियोजन आणि प्रामाणिक प्रयत्नांच्या जोरावर शाळेचा चेहरामोहरा बदलण्यात आला. ई-लर्निंग, सेमी इंग्लिश, बोलक्या भिंती, वाचनासाठी बोलकी फळे, स्वतंत्र वाचनालय, स्वच्छ पिण्याचे पाणी, मध्यान्ह भोजनासाठी बैठक व्यवस्था, प्रकाशयंखे, आरोग्य तपासणी, स्वतंत्र शौचालये, रोजचा कचरा व्यवस्थापन अशा सुविधा शाळेत उभ्या राहिल्या आहेत. त्याचबरोबर परसबागेतून पालेभाज्या, कांदा, लसूण, टोमॅटो, फुले फुलत असून शाळा निसर्गरम्य झाली आहे. दि. १५ जानेवारी रोजी गटविकास अधिकारी मुकेश माहोर व शिक्षण विस्तार अधिकारी बबन कुमठे यांनी शाळेला भेट देत समाधान व्यक्त केले.

# बुलढाण्यात अनोळखी वृद्ध महिलेचा संशयास्पद मृत्यू; नातेवाईकांचा शोध सुरू

**जनसंचलन/बुलढाणा**



जिल्हा सामान्य रुग्णालयातील अपघात विभागात दाखल करण्यात आलेल्या एका अनोळखी वृद्ध महिलेचा मृत्यू झाल्याने खळबळ उडाली आहे. सदर महिला दिव्या फाउंडेशन, बुलढाणा यांच्याकडून उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आली होती. मात्र डॉक्टरांनी तपासाअंती तिला मृत घोषित केले. या प्रकरणी बुलढाणा ग्रामीण पोलीस स्टेशनमध्ये मर्ग क्रमांक ०२/२०२६ नोंदवण्यात आला असून पोलिसांनी आता थेट नातेवाईकांचा शोध सुरू केला आहे. मृत महिलेचे वय अंदाजे ६५ ते ६८ वर्षे असून तिची उंची सुमारे १६० सेंटीमीटर, बांधा सडपातळ, रंग सावळा आहे. डोक्यावरील केस पूर्णतः पांढरे असून कपाळाच्या मध्यभागी टिकली गोंदलेली आहे. मृत्यूवेळी तिच्या अंगात लाल व पांढऱ्या रंगाचा गाऊन होता. मात्र इतकी स्पष्ट ओळख असतानाही ही महिला कोण, कुठून आली आणि तिचे नातेवाईक कुठे आहेत, याचा अद्याप उलगडा झालेला नाही. महत्त्वाचे म्हणजे, वृद्ध महिलेला कोणत्या परिस्थितीत रुग्णालयात दाखल करण्यात आले, तिला अपघात झाला होता की इतर काही प्रकार घडला होता, याबाबतही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले असून या वर्णनाशी जुळणारी कोणतीही माहिती असल्यास तात्काळ बुलढाणा ग्रामीण पोलीस स्टेशनशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. नातेवाईकांचा शोध लागेपर्यंत ही घटना अनेक गंभीर प्रश्न उपस्थित करत आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८